# Vigyan Bharati

## Vidarbha Pradesh Mandal

## Meeting of Fulltime Karyakartas of VIBHA

at

**Nagpur**

On

**20 - 22 July 2021**

# Report

विज्ञानभारतीच्या पूर्णकालीन कार्यकर्त्यांची बैठक दिनांक २१ व २२ जुलैला भारतीय उत्कर्ष मंडळ खापरी नागपूर येथे झाली. सभेला श्री शंकरराव, श्री जयंतराव सहस्रबुद्धे राष्ट्रीयसंगठन मंत्री , श्री प्रवीणजी रामदास , सचिव , श्री गोपालजी पार्थसारथी चेन्नई , श्री प्रजातंत्रजी माळवा प्रांत , श्री श्रीप्रसादजी कोलकाता , श्री श्रेयांस मंडलोई अवध प्रांत , व श्री आबगाजी उपस्थित होते .

सर्वमान्यवरांचे आगमन दिनांक २० जुलैला झाले. २० जुलैला सायंकाळी ५.३० वाजता श्री जयंतरावयांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ डी के गुप्ता यांची भेट घेतली. सर्वमान्यवरांची राहण्याची व्यवस्था भारतीय उत्कर्ष मंडळ खापरी येथे केली होती.

२१ जुलै रोजी बैठक पार पडली. विभा कार्यकारिणी कडून सर्व अतिथींना व भारतीय उत्कर्ष मंडळाचे श्री शिरीशजी वते यांना एक एक सुटकेस भेट वस्तू म्हणून देण्यात आली.

२२ जुलै रोजी सर्व अतिथींनी कवीकालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक चे कुलगुरू डॉ. वारखेडी यांची भेट घेऊन नंतर परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांचे निवासस्थान येथे भेट दिली. सर्वमान्यवरांनी देवलापार येथील गौविज्ञान अनुसंधान केंद्राला भेट देऊन तिथेच दुपारचे जेवण घेतले.

सर्वजण नंतर महालातील डॉ. हेडगेवारयांचे निवासस्थान , महाल संघकार्यालय व स्मृती मंदिर रेशीमला भेट देऊन निरी अतिथीगृहात आले. तेथे विभा विदर्भ कार्यकारिणी चे सर्वसदस्य उपस्थित होते. CSIR चे डायरेक्टर जनरल डॉ. शेखर मांडे व निरीचे डायरेक्टर डॉ. चंद्रशेखर यांची पण अनौपचारिक भेट झाली. रात्रीचे घेतल्यानंतर दुसऱ्यादिवशी सर्व अतिथींचे प्रस्थान आपापल्याठिकाणी झाले .

# Meeting of Fulltime Karyakartas of VIBHA













# Vigyan Bharati
## Vidarbha Pradesh Mandal






